-: प्रेसनोट दिनांक २१/०१/२०२२ :-

१. विजय कारंडे, पो.हे.कॉ.ब.न.१४६७, २. किरण धोडींराम गावडे, पो.ना.ब.न. १४७४, नेमणुक स्थानीक गुन्हे अन्वेषन विभाग, कोल्हापूर यांनी २५,००,०००/- रुपयाची लाच मागणी करुन १०,००,०००/- लाख रुपये लाच स्विकारलेबाबत.......

---

तक्रारदार यांचा मुलगा हा जुन्या स्पोर्ट बाईक विक्री चा व्यवसाय करतो आलोसे विजय कारंडे व किरण गावडे यांनी तक्रारदार यांचा मुलगा चोरीच्या स्पोर्ट बाईक आणतो व विक्री करतो, तसेच डुप्लीकेट स्मार्ट कार्ड बनवतो म्हणुन तक्रारदार यांचा मुलगा यास स्था.गु.अ.शाखा, कोल्हापूर येथे दिनांक १८/१/२०२२ रोजी व दिनांक १९/०१/२०२२ रोजी त्यास दिवसभर बसविले त्याचेवर मोका अंतर्गत गुन्हा दाखल करतो असे सांगुन २५ लाख रुपयाची मागणी केली.

दिनांक २०/०१/२०२२ रोजी तक्रारदार यांनी तक्रार दिली होती. तक्रारीप्रमाणे पडताळणी केली असता पडताळणीमध्ये विजय कारंडे व किरण गावडे यांनी तक्रारदाराकडे २५ लाख रुपये लाचेची मागणी केलेचे निषन्न झाले.

दिनांक २१/०१/२०२२ रोजी सापळा कारवाई आयोजीत केली असता पोलीस अधीक्षक कार्यालय, कोल्हापूर चे बाजुस पंच साक्षीदारांचे समक्ष तक्रारदार यांचेकडुन विजय कारंडे व किरण गावडे यांनी १० लाख रूपये लाच रक्कम स्विकारलेने त्यांना रंगेहाथ पकडणेत आले आहे. सदरबाबत विजय कारंडे व किरण गावडे यांचेविरूध्द शाहुपूरी पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करणेची प्रक्रीया सुरू आहे.

सदरची कारवाई मा. श्री राजेश बनसोडे, पोलीस उपआयुक्त/ पोलीस अधीक्षक, अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे, मा. सुरज गुरव, अपर पोलीस अधीक्षक, अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे, मा. श्री सुहास नाडगौडा, अपर पोलीस अधीक्षक, अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांचे मार्गदर्शनाखाली श्री आदिनाथ बुधवंत, पोलीस उपअधीक्षक, अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो कोल्हापूर, पोना विकास माने, पोना सुनिल घोसाळकर, पोना नवनाथ कदम, पोकॉ मयुर देसाई, पोकॉ रूपेश माने, चापोहेकॉ सुरज अपराध, अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो कोल्हापूर यांनी केली आहे.

सर्व नागरिकांना आवाहन करणेत येते की, लाचेच्या अथवा अपसंपदेबाबत तकारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील कमांकावर संपर्क साधावा.

१) मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई टोल फ्री कमांक :- १/८००२२२०२१

२) मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी कमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.

३) श्री.आदिनाथ बुधवंत, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर मो.नं. ९०११२२८३३३,

४) कार्यालय दुरध्वनी कमांक - ०२३ १/२५४०९८९. ५)हेल्पलाईन टोल फ्री कमांकः- १०६४,

५) व्हॉटस अप कमांक :- ७८७५३३३३३३.

Scanned by TapScanner